## शासकीय माहिती अधिकार अधिनियम 2005 चे (नियम 3 कलम 19 अ) अन्वेय अर्ज

प्रति,

मा. जनमाहिती अधिकारी,

लेखा परीक्षण विभाग,

मिरा भाईंदर महानगरपालिका, भाईंदर

9335 (का.उ.)
23/03/2023

लेखा परिक्षण वि
आवक :- 64
23/03/23

| | | |
|---|---|---|
| 1) | अर्जदाराचे संपूर्ण नाव | राजेश महादेव जाधव<br>भ्रमणध्वनी क्र. 9323276613 |
| 2) | अर्जदाराचा पूर्ण पत्ता | डी-17, शांती शॉपिंग सेंटर, मीरा रोड रेल्वे स्टेशन समोर, मीरा रोड, जि. ठाणे - 401107 |
| 3) | माहितीचा विषय | मंजूर निधी व त्या निधीचा वापर करण्याविषयी... |
| 4) | आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील | 1) मीरा भाईंदर महानगरपालिका मध्ये सर्व विभाग निहाय सन 2016-17, 2017-18, 2018-19, 2019-20, 2020-21, 2021-22, 2022-23 आर्थिक वर्षाला मंजूर निधी व खर्च करण्यात आलेल्या निधीचा संपूर्ण तपशील मिळावा.<br>2) मनपा अंतर्गत विभाग निहाय तरतूद करण्यात आलेल्या निधीचा खर्च करण्याच्या कार्यपद्धतीची संपूर्ण माहिती (परिपत्रक/जीआर ) मिळावी . |
| | 1.माहिती ज्याच्याशी संबंधित आहे तो कालावधी | 1 एप्रिल 2016 ते आजपर्यंत |
| | 2.आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन | वरील प्रमाणे |
| | 3. माहिती टपालाद्वारे किंवा आवश्यक आहे किंवा नाही कसे ? | - व्यक्तीश: |
| | 4.टपालाने माहिती हवी असेल तर कोणत्या टपालाने? | निरंक |
| 5) | अर्जदार दारिद्र्य रेषेखालील आहे किंवा कसे ? | नाही |

देण्यात येणाऱ्या माहितीचे सर्व कागदपत्राच्या साक्षांकित व सत्यप्रतीसही शिक्यानिशी दयाव्यात.

ठिकाण : भाईंदर

दिनांक : 23/03/2023

अर्जदाराची सही

( राजेश महादेव जाधव )

लेखा परिक्षण विभाग
आवक :- 08
दिनांक :- 23/5/2023

## जोडपत्र "ब" नियम (5(1))

## केंद्रशासन माहितीचा अधिकार अधिनियम, 2005-कलम19 (1) अन्वये प्रथम अपील

प्रति,
**मा. प्रथम अपीलीय अधिकारी,**
**लेखा परीक्षण विभाग,**
मीरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर.




1. अपीलकाराचे पूर्ण नाव :- **राजेश महादेव जाधव (संपादक : मिशन जनकल्याण)**

2. अपीलकाराचा पूर्ण पत्ता :- **डी-17, शांती शॉपिंग सेंटर, मीरा रोड रेल्वे स्टेशन समोर,**
   **मीरा रोड - 401107 मो. 9323276613.**

3. संबंधित जनमाहिती अधिकाऱ्याचा तपशील :- **जनमाहिती अधिकारी**
   **लेखा परीक्षण विभाग,**
   **मिरा भाईंदर महानगरपालिका.**

4. ज्या आदेशाविरूद्ध अपील करावयाचे आहे त्या निर्णयाची तारीखः- **माहिती देण्यात आली नाही.**
5. अपील करण्यासाठी अखेरची तारीखः- **23/05/2023**
6. अपील करण्याचे कारण :- **मुदतीत माहिती देण्यात आलेली नाही.**
7. आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील :- **सोबत माहितीचा अधिनियम 2005 अन्वय केलेला अर्ज जोडत आहे.**

   (एक) आवश्यक असलेल्या माहितीचा विषय व स्वरूप :- **सोबत माहितीचा अधिनियम 2005 अन्वय केलेला अर्ज जोडत आहे.**

   (दोन) माहिती ज्याच्याशी संबंधित आहे त्या कार्यालयाचे किंवा विभागाचे नाव :- **लेखा परीक्षण विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका.**

ठिकाण :- भाईंदर
तारीख :- 23/05/2023

अपीलकारकाची स्वाक्षरी

( राजेश महादेव जाधव )

माहितीचा अधिकर अधिनियम 2005 कलम 19(1) अन्वये दाखल प्रथम अपिलाची सुनवाणी

अपील (प्रथम) क्र. ............, दि. 26/05/2023, वेळ - दुपारी 12.00 वाजता.

१) श्री. राजेश महादेव जाधव,
डि-17, शांती शॉपिंग सेंटर,
मिरारोड रेल्वे स्टेशन समोर,
मिरारोड (पु.), ता.जि.ठाणे - 401107 ..... अपिलार्थी

विरुध्द

२) जन माहिती अधिकारी तथा
उपमुख्यलेखापरिक्षक,
मिरा भाईंदर महानगरपालिका ..... प्रतिवादी

सदर सुनावणीसाठी खालील अधिकारी व अपिलार्थी उपस्थित होते.

| अ.क्र | उपस्थित नाव | सही |
|---|---|---|
| 1 | **श्री. सुधीर नाकाडी,**<br>प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्यलेखापरिक्षक | |
| 2 | **श्रीमती. मंजिरी डिमेलो**<br>जन माहिती अधिकारी तथा उपमुख्यलेखापरिक्षक | 26/5/23 |
| 3 | **श्री. राजेश महादेव जाधव**<br>अपिलार्थी | 26/05/2023 |

E:\Audit Dep 2020-21\माहिती अधिकार\राजेश जाधव.Docx

लेखा मुक्तिवाद

प्रति दिनांक २६/०५/२०२३

**मा. प्रथम अपीलीय अधिकारी तथा**

मुख्य परीक्षक,

मीरा भाईंदर महानगरपालिका, भाईंदर.

**अपीलकर्ता : राजेश महादेव जाधव**

पत्ता :- डी- १७, शांती शॉपिंग सेंटर, मीरा रोड रेल्वे स्टेशन समोर,

मीरा रोड - ४०११०४ मो. ९३२३२७६६१३.

**विषय : माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये दाखल प्रथम अपील सुनावणी दिनांक २६/०५/२०२३, दुपारी १२.०० वा.**

**संदर्भ :** १) आपले दिनांक २३/०५/२०२३ रोजीचे जा. क्र. मनपा /मु. ले. प. /०६/२०२३-२४ चे पत्र

महोदय,

आपण संदर्भिय पत्रानुसार माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये दाखल प्रथम अपील सुनावणी **दिनांक २६/०५/२०२३, दुपारी १२.०० वा.** घेत असताना आपल्याकडे प्रथम अपील करण्याची कारणे खालीलप्रमाणे आहेत.

कारण : शासन परीपत्रक क्र. संकीर्ण २०१७/प्र . क्र. (२०८ /१७ ), दिनांक १७/११/२०१७ चे उल्लघन करून माहिती मुदतीत न दिल्यमुळे.

सबब, माहिती लपविण्यासाठी जाणीवपूर्वक मा. जनमाहिती अधिकारी यांनी बेजबाबदारपणे माहिती उपलब्ध करून दिण्यास दिरंगाई केल्याचे दिसून येते. त्यामुळे आपण संबंधित मा. जनमाहिती अधिकारी यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये उचित कारवाई करावी तसेच मला अपेक्षित माहिती विनाविलंब मिळावी ही विनंती.

अपीलकर्ता

(राजेश महादेव जाधव)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

जा.क्र.माअधि/अपिल/ /2023-24
प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य लेखापरीक्षक
स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प)
ता.जि.ठाणे-401101, दुरध्वनी क्र : 28192828
Email.Id:- mbmcaudit@gmail.com
मुख्य लेखापरीक्षक यांचे कार्यालय
जा.क्र.मनपा/मुलेप/ ०८ /2023-24
दि.३१ /०५ /2023

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्यलेखापरीक्षक मिरा भाईंदर महानगरपालिका यांचेसमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.**

**श्री. राजेश महादेव जाधव,** ......**अपिलार्थी**
**डी-17, शांती शॉपिंग सेंटर,**
**मिरारोड रेल्वे स्टेशन समोर, मिरारोड (पु.)**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** ......**प्रतिवादी**
**मुख्यलेखापरीक्षक, लेखापरीक्षण विभाग**

अपिलार्थी श्री. राजेश महादेव जाधव यांनी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 नुसार तत्कालीन जनमाहिती अधिकारी तथा लेखापरिक्षा अधिकारी, मुख्यलेखापरिक्षण विभाग यांचेकडे मंजुर निधी व त्या निधीचा वापर करण्याविषयी दि.23/05/2023 रोजी खालीलप्रमाणे माहिती अधिकार अर्ज सादर केला होता.

1) मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये सर्व विभाग निहाय सन 2016-17, 2017-18, 2018-19, 2019-20, 2020-21, 2021-22, 2022-23 आर्थिक वर्षाला मंजुर निधी व खर्च करण्यात आलेल्या निधीचा संपूर्ण तपशिल मिळावा.
2) मनपा अंतर्गत विभाग निहाय तरतुद करण्यात आलेल्या निधीचा खर्च करण्याच्या कार्यपध्दतीची संपूर्ण माहिती (परिपत्रक/जी.आर.) मिळावी.

**अपिल दाखल करण्याचे कारण:-**

माहिती अधिकार अंतर्गत दि.24/03/2023 रोजीच्या अर्जानुसार माहिती दिली नसल्याने अपिलार्थी यांनी दि.23/05/2023 रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्यलेखापरिक्षक यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**सुनावणीचा तपशिल :-**

अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी तथा उपमुख्यलेखापरीक्षक यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.26/05/2023 रोजी 12.00 दुपारी वाजता उपस्थित राहणेबाबत जा.क्र/मनपा/मुलेप/06/2023-24, दि.23/05/2023 रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. त्यानुसार सदर सुनावणीस अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी तथा उपमुख्यलेखापरिक्षक उपस्थित आहेत.

**अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान लेखी युक्तीवाद :-**

माहिती लपविण्यासाठी जाणीवपूर्वक मा. जनमाहिती अधिकारी यांनी बेजबाबदारपणे माहिती उपलब्ध करुन देण्यास दिरंगाई केल्याचे दिसुन येते. तरी संबंधीत मा. जनमाहिती अधिकारी यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 अन्वये उचित कारवाई करावी आणि अपेक्षित माहिती विनाविलंब उपलब्ध करुन द्यावी.

**जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तीवाद :-**

माहिती अधिकार अर्जातील नमुद मुद्दे हे लेखा विभागाशी संबंधीत असल्याने लेखापरिक्षण विभागातील तत्कालीन माहिती अधिकारी यांनी सदर अर्ज लेखा विभागास वर्ग करणे अपेक्षित होते. परंतु तसे न केल्याने अपिलार्थी यांना माहिती मिळालेली नाही. अपिलार्थी यांना माहिती मिळणे क्रमप्राप्त असल्याने सदरच्या माहितीअर्जामधील मुद्दयांची माहिती लेखाविभागातील जनमाहिती अधिकारी तथा लेखाधिकारी यांनी अपिलार्थी यांना देणे उचित राहील.

**वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.**

**-: निर्णय :-**

1) अर्जदार यांनी दि.24/03/2023 रोजी तत्कालीन जनमाहिती अधिकारी तथा लेखापरिक्षा अधिकारी, लेखापरिक्षण विभाग यांचेकडे माहिती अधिकार अर्ज दाखल केला होता. सदर माहिती अधिकार अर्जातील मुद्दे हे लेखा विभागाशी संबंधीत असल्याने माहिती अधिकार कलम 6(3) अन्वये सदरचा अर्ज लेखा विभागाकडे वर्ग करणे अपेक्षित होते. परंतु तत्कालीन जनमाहिती अधिकारी तथा लेखापरिक्षा अधिकारी, लेखापरिक्षण विभाग यांनी सदरचा माहिती अधिकार अर्ज संबंधीत विभागास वर्ग न केल्याचे दिसुन येते. सबब याबाबत तत्कालीन जनमाहिती अधिकारी तथा लेखापरिक्षा अधिकारी यांना समज वजापत्र देणेत यावे.
2) अर्जदाराने दाखल केलेल्या माहिती अधिकार अर्जातील मुद्दे हे लेखा विभागाशी संबंधीत असल्याने जनमाहिती अधिकारी तथा लेखाधिकारी, लेखा विभाग यांनी अपिलार्थी यांना दप्तरी अभिलेखात असणारी माहिती 7 दिवसात विनामुल्य उपलब्ध करुन देणेत यावी.
3) सदर आदेशाविरुध्द अपिल करावयाचे असल्यास मा. राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, 5 वा मजला, दालन क्र.528, कोकण भवन, सी. बी.डी. बेलापुर, नवी मुंबई-400614 यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासुन 90 दिवसांच्या आत अपिल दाखल करता येईल.

(सुधीर नाकाडी)
**प्रथम अपिलीय अधिकारी**
**तथा मुख्यलेखापरीक्षक**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रति**

1) **श्री. राजेश महादेव जाधव**
   **डी-17, शांती शॉपिंग सेंटर,**
   **मिरारोड रेल्वे स्टेशन समोर,**
   **मिरारोड (पु.), ता.जि. ठाणे - 401107**
2) **जन माहिती अधिकारी तथा उपमुख्यलेखापरीक्षक,**
   **लेखापरिक्षण विभाग**
3) **जनमाहिती अधिकारी तथा लेखाधिकारी,**
   **लेखा विभाग (सोबत माहिती अधिकार अर्ज)**
4) **माहिती अधिकार अपिल नस्ती**
   **प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्यलेखापरिक्षक यांचे कार्यालय**

D:\Pravin\माहिती अधिकार\राजेश जाधव.Docx